६.५ वेळेवर पेरणी केलेल्या पिकास १५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या देवून व खुरपणी करून शेत तणविरहीत ठेवा.

६.६ ऊन्हाळी भुईमूगास जमिनीच्या मगदूराप्रमाणे ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्या.

७) <u>ऊन्हाळी सूर्यफूल</u> :

७.१ ऊन्हाळी सूर्यफूल पेरणी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात पूर्ण करा.

७.२ एस.एस.-५६, भानू, मॉर्डन या सुधारीत जातींचा किंवा एल.डी.एम.आर.एस.एच. १ किंवा ३, एम.एस.एफ.एच. १७, के.बी.एस.एच. ४४ किंवा फुले रवीराज किंवा एम.एस.एफ.एच.-१७ या संकरित वाणाचा उपयोग करा.

७.३ मध्यम खोल जमिनीसाठी दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी.×२२.५ सें.मी. तर भारी जमिनीसाठी ६० सें.मी.×३० सें.मी. अंतरावर टोकण करावी.

७.४ पेरणीच्या वेळी पिकास हेक्टरी प्रत्येकी ३० किलो नत्र, स्फुरद, पालाश या रासायनिक खतांच्या मात्रा पेरताना द्या. ऊरलेला ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी पाण्याच्या पाळीपूर्वी द्यावे.

७.५ पेरणीनंतर १५-२० दिवसांनी भारी जमिनीत ३० सें.मी. व मध्यम हलक्या जमिनीत २२.५ सें.मी. अंतरावर एकच जोमदार रोप ठेवून विरळणी करा.

७.६ पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, मॅन्कोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

७.७ सूर्यफुलावरील केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ %) किंवा कडुनिंब आधारित कीडनाशक (अॅझाडिरेक्टीन ५० हजार पीपीएम) १ मि.लि. प्रति लिटर अथवा डायमिथोएट (३० इ.सी.) २ मि.लि किंवा क्विनॉलफॉस (२५ इ.सी) २ मिलि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किडीचे अंडीपुंज, अळ्या गोळा करुन नाश करावा. कार्बारील भुकटी (१०%) २० किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात धुरळावी.

८) <u>फळबाग</u> :

८.१ नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांचे व नारळ रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी आवश्यकतेनुसार सावली करा.

८.२ नवीन लागवड केलेल्या कलमांना/रोपांना काठीचा आधार द्या व आलेला मोहोर आणि फुले काढून टाका.

८.३ नवीन फळबाग लागवडीमध्ये ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. त्याठिकाणी पालापाचोळा आच्छादनाबरोबरच मडका सिंचन पध्दतीचा अवलंब करा.

८.४ पूर्ण वाढलेल्या नारळाच्या झाडांना नत्र खताचा तिसरा हप्ता (७५० ग्रॅम युरिया प्रती झाड) द्या.

८.५ काजूच्या झाडावर फळे धरताना ३ टक्के युरिया द्रावणाची फवारणी करा. (३० ग्रॅम प्रति लिटर पाणी)

८.६ काजूच्या बागेला फळ धारणेच्या वेळी संरक्षित पाणी द्या.

८.७ काजूच्या मोहोरावरील करपा/शेंडेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास १२५० ग्रॅम डायथेन एम-४५ हे बुरशीनाशक ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. (२.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी)

८.८ आंब्याच्या कलमावर फळ धारणा झाल्यानंतर लगेच एन.ए.ए. १५ पी.पी.एम. या संजिवकाची फवारणी करा. (१५ मिली ग्रॅम प्रति लिटर पाणी)